क्र. शिक्षण/खाप्रशा/३/कावि/१०८६/९९
शिक्षण मंडळ कार्यालय,
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८.
दिनांक- १३/१२/९९.

प्रति,

सचिव/अध्यक्ष,
श्री. ज्ञानदेव शिक्षण प्रसारक मंडळ, मालेगाव ता० बार्शी
जि. सोलापूर

विषय :- सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास देण्यात आलेल्या परवानगीबाबत.

संदर्भ :- १. शासन पत्र क्र. व्हीएलएस-१०९९/२६०/प्राशि-३ दि. २२/१०/९९.
२. मा. शिक्षण उपसंचालक पुणे यांचेकडील पत्र क्र. प्रा/प्राशि/खाप्राशा/मान्यता/पुवि/९९/१३३७३ दि. १/११/९९.
३. व्ही. एल. एस/१०९८/१३१/प्राशि/३/दि. ९/७/९९.
व्हीएलएस /१०९९/२६०/प्राशि-३ दि. ६/७/९९.
दि. ८/७/९९ दि. ९/७/९९.

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, [illegible] से.नं.२०, चिखली माध्यम मराठी शाळेस सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथ. शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात आलेली होती. संदर्भ क्र. २ नुसार मान्यतेबाबतची कार्यवाही पुढील आदेश होईपर्यंत स्थगित ठेवण्याचे कळविले आहे. याची नोंद घ्यावी.

प्रशासन अधिकारी
शिक्षण मंडळ
पिंपरी-चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-१८.

Received on 29.12.99

सन् १९९९-२००० यावर्षी [जून, १९९९ पासून] इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त
नवीन खाजगी प्राथमिक शाळांना परवानगी देण्याबाबत शासनपत्र क्रमांक
व्हीएलएस१०९९/२८०/प्राशि-१, दि. ९जुलै, १९९९

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | माध्यम |
|---|---|---|---|
| | **पुणे** | | |
| १] | वनस्थळी ग्रामविकास केंद्र, ३१८-ब कॅनॉल रोड, मॉडेल कॉलनी, पुणे-१६. | मा. बापूसाहेब गावडे प्राथमिक शाळा, रांजणगांव गणपती, एम.आय.डी.सी. शिरुर, जि. पुणे. | मराठी |
| २] | श्री. नर्मदेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ मालेगांव, ता. बार्शी, जि. सोलापूर | नुतन विद्यामंदिर, कृष्णानगर सेक्टर नं. २०, चिंखली रोड, पिंपरी ११ चिंचवड, पुणे. | मराठी |
| | **सोलापूर** | | |
| ३] | कै. उद्धवराव पाटील क्रिडा व शिक्षण प्रसारक मंडळ, वैराग ता. बार्शी जि. सोलापूर. | शारदादेवी प्राथमिक शाळा वैराग, ता. बार्शी | मराठी |
| ४] | महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ, बाळे सोलापूर. | राजू प्राथमिक शाळा बाळे बार्शी सोलापूर. | मराठी |

स्थळ प्रतीवर मा. शि. उ. सं.
यांची सही असे

शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे-१. कारिता

प्रति,
संबंधित संस्था

१] सचिव/अध्यक्ष,
रास्तापेठ एज्युकेशन सोसायटी, ३५२. सोमवारपेठ, पुणे-११.

२] सचिव/अध्यक्ष,
जनहित सेवा मंडळ, नवीपेठ, महाड, जि. रायगड

३] सचिव/अध्यक्ष,
दामोदर शिक्षण प्रसारक मंडळ बहुउद्देशिय समाजसेवी ही संस्था,
२१५, उत्तर कसबा, सोलापूर

४] सचिव/अध्यक्ष
स्व. माधवराव नंदलाल मेंगजी एज्युकेशन सो. ट्रस्ट, १५६, मुरारजी पेठ,
लकी चौक, सोलापूर

५] सचिव/अध्यक्ष
विवेकानंद शिक्षण प्रसारक मंडळ, माळशिरस, जि. सोलापूर

६] सचिव/अध्यक्ष,
कै. लोकशिर शाहीर अण्णाभाऊ साठे शिक्षण प्रसारक मंडळ, पंढरपूर
जि. सोलापूर

७] सचिव/अध्यक्ष,
सौ. लक्ष्मीबाई शांताराम डोके समाज विकास प्रतिष्ठान, ६, पराग प्लाझा
सावेडी रोड, ता. जि. अहमदनगर.

८] सचिव/अध्यक्ष
वनस्थळी ग्रामविकास केंद्र, ३१८-ब, कॅनॉल रोड, मॉडेल कॉलनी, पुणे-१६

९] सचिव/अध्यक्ष,
श्री. नर्मदेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ, माळेगांव ता. बार्शी जि. सोलापूर

१०] सचिव/अध्यक्ष
कै. उद्धवराव पाटील क्रिडा व शिक्षण प्रसारक मंडळ, वैराग ता. बार्शी जि. सोलापूर

११] सचिव/अध्यक्ष
महाराष्ट्र शिक्षण प्रसारक मंडळ, बाळे सोलापूर.

जा. क्र. प्रा/प्राशि/आप्राशा/मान्यता/पुवि/ ९९ 2049

शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग,
पुणे-१ यांचे कार्यालय.
दिनांक :- - 6 AUG 1999

प्रति,

शिक्षणाधिकारी [प्राथमिक],
जिल्हा परिषद, पुणे/सोलापूर/अहमदनगर

प्रशासन अधिकारी,
महानगरपालिका/नगरपालिका
प्राथमिक शिक्षण मंडळ, पुणे/पिंपरी चिंचवड/सोलापूर/ता. पंढरपूर, जि. सोलापूर/ता. महाड जि. रायगड

विषय :- सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षात खाजगी प्राथमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्याबाबत. माध्यम - मराठी

संदर्भ :- शालेय शिक्षण विभागाकडील शासनपत्र क्रमांक : व्हासएस- १०९९ /[२६० ] प्राशि-३, दिनांक - ६.७.९९, ८.७.९९, ९.७.९९

वरील विषयाचे संदर्भान्वये आपणांस कळविण्यात येते की, खाली नमूद करण्यात आलेल्या पात्र/ताकि प्राथमिक शाळांना त्यांचे नावासमोर दर्शविलेल्या माध्यमातून सन १९९९-२००० या शैक्षणिक वर्षापासून परवानगी देण्याचे प्रस्तावित आहे.

| अ. क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण | माध्यम |
|---|---|---|---|
| | सोबत जोडलेल्या यादीप्रमाणे. | | |

त्यामुळे या संस्थांकडून खालील अटींची पूर्तता होते किंवा कसे याबाबत आपण समक्ष भेट देऊन विहीत नमुन्यात अहवाल आपल्या स्पष्ट अभिप्रायासह या कार्यालयास सादर करावा.

आपला अहवाल प्राप्त झाले नंतरच संबंधित संस्थांना परवानगी देणे / न देणे या बाबतचे आदेश निर्गमित करता येतील.

[१] संबंधित संस्था, संस्था नोंदणी अधिनियम १८६० व मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी, किंवा [illegible] मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० प्रमाणे नोंदणीकृत असावी.

[२] संस्थेविरुध्द गंभीर स्वरूपाच्या तक्रारी नाहीत.

[३] सदर संस्थेने चालविलेल्या अन्य प्राथमिक/माध्यमिक शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

[४] संबंधित संस्थेत कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार चालत असल्याबाबतच्या तक्रारी आलेल्या नाहीत अथवा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबतचे एखादे प्रकरण प्रलंबित नाही.

[५] संस्थेची आर्थिक परिस्थिती पुरेशी समाधानकारक आहे.

दा.ता. 10/8/99

जनरल सेक्रेटरी
श्री नर्मदेश्वर शिक्षण प्रसारक मंडळ
[illegible] ता० बार्शी, जि० सोलापूर

[६] संस्थेने विहित नमुन्यात सुधारित शुल्कासह अर्ज केला आहे व अर्जातील संस्थेचे नांव, शाळेचे ठिकाण यात तफावत नाही.

[७] शासनाची मंजुरी नसताना प्राथमिक शाळा चालू ठेवण्याबाबत प्रत्येक शैक्षणिक वर्षासाठी रु. १००/- दंड संस्थेने कोषागारात भरला आहे.

[८] संस्था यथानियम शासन मान्यतेसाठी कागदपत्रांची पूर्तता तीन महिन्यात पूर्ण करेल.

[९] संस्थेने शाळेमध्ये शासनाच्या विहित केलेल्या शैक्षणिक शुल्क दरानुसार शुल्क आकारणे आवश्यक आहे.

[१०] सक्षम अधिकाऱ्यांनी संबंधित संस्थांना मान्यता देताना शाळेत सुरु असलेले वर्ग त्यातील विद्यार्थी संख्येचा प्रत्यक्ष तपासणी करुन मान्यता प्रदान करावी.

[११] सक्षम अधिकाऱ्यांच्या मान्यतेशिवाय मान्य तुकडा संख्येपेक्षा जादा तुकड्या संबंधित संस्था उघडणार नाही, असे संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. १०/-च्या स्टॅम्प पेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.

१२] शासनाची परवानगी ज्या माध्यमासाठी देण्यात आली आहे ते माध्यम वगळता अन्य माध्यमाच्या तुकड्या संबंधित शाळा काढणार नाही, याबाबत देखील संबंधित संस्थेकडून परवानगी देण्यापूर्वी रु. १०/-च्या स्टॅम्प पेपरवर लेखी हमीपत्र घेणे आवश्यक आहे.

[१३] संस्थेस ज्या वर्षी शाळेस परवानगी द्यावयाची आहे, त्या वर्षी संबंधित संस्थेने शाळा सुरु न केल्यास पुढील वर्षीच्या शाळा नुतनीकरणासाठी परवानगी दिलेल्या शैक्षणिक वर्षातच अर्ज करणे संस्थेवर बंधनकारक राहील. अन्यथा शासनाने दिलेली परवानगी रद्द समजण्यात येईल. तसेच एक वर्षानंतर नुतनीकरणासाठी केलेल्या अर्जाचा विचार करता येणार नाही.

[१४] संस्थेकडून रुपये - २०/-च्या कोर्टाच्या मुद्रांकित बंधपत्रावर संस्था कायम स्वरुपी विना-अनुदान तत्वावर माध्यमाची प्राथमिक शाळा चालविण्यास तयार असून भविष्यकाळात शासनाकडे कोणत्याही प्रकारच्या अनुदानाची मागणी करणार नाही असे हमीपत्र संस्थेकडून लिहून घेणे आवश्यक आहे व याच्या साक्षांकित प्रती आपण आपल्या संबंधित नस्तीवर कायमस्वरुपी जतन करुन ठेवाव्यात.

वरील सर्व अटींच्या पूर्ततेचा अहवाल या कार्यालयास प्राप्त झालेनंतरच पुढील आदेश निर्गमित केले जातील.

स्थळ प्रतीवर मा. शि. उ. यांची सही असे

शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे-१ करिता

प्रत :

१] मा. अवर सचिव,
शालेय शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन,
मुंबई-३२ यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

२] मा. शिक्षण संचालक,
शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे-१ यांचेकडे माहितीसाठी सविनय सादर.

प्रति:

३] सचिव/अध्यक्ष,
संबंधित संस्था. ..........सोबत यादी जोडली आहे